दि. 22/05/2023

म.टा.पा.न. ५

# 'कोश्यारी हे राज्याचे गुन्हेगार'

## मुख्यमंत्री–माजी राज्यपाल भेटीवर संजय राऊत यांची प्रतिक्रिया

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शनिवारी मुंबईत भेट घेतली असून, या भेटीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खा. संजय राऊत यांनी तीव्र शब्दांत टीका केली आहे. कोश्यारी हे महाराष्ट्राचे गुन्हेगार असून, त्यांनी महाराष्ट्राचा अपराध केला आहे. हा अपराध किती मोठा होता हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे, असा दावा राऊत यांनी केला.



महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेल्या निकालात तत्कालीन राजकीय परिस्थितीबाबत त्यावेळचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावर कठोर ताशेरे ओढले आहेत, असे ते म्हणाले. तरीही त्यांना मुख्यमंत्री शिंदे हे भेटत असतील तर ती त्यांची प्रवृत्ती आहे. घटनाबाह्य काम करून कोश्यारींनी एक राज्य आणले, असा आरोप राऊत यांनी केला. आपण आणलेल्या घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांना भेटायला माजी राज्यपाल गेले असतील. तर ते दोन घटनबाह्य व्यक्ती पाहून घेतील. आम्हाला त्यात स्वारस्य नाही, असे ते राऊत म्हणाले.

चलनातून दोन हजार रुपयांची नोट बाद करण्याच्या रिझर्व्ह बँकेच्या निर्णयावरही राऊत यांनी टीका केली. पहिली आणि दुसरी नोटाबंदी फसली. दोन हजार रुपयांच्या नोटा तुम्हीच आणल्या आहेत ना, असा प्रश्न करून एक हजार रुपये आणि ५०० रुपयांच्या नोटा चलनात होत्या, यामुळे किती भ्रष्टाचार, दहशतवाद कमी झाला असा प्रश्न आहे. त्यावेळी नोटाबंदीच्या निर्णयामुळे नोटा बदलून घेण्यासाठी बँकांच्या शाखांसमोर उभी असलेली साडेतीनशे लोक रांगेत मेली, असा आरोप राऊत यांनी केला. हा सदोष मनुष्यवध असून, याचे प्रायश्चित सत्ताधारी भाजप प्रायश्चित घेणार आहे काय असा प्रश्नही त्यांनी केला.

### राऊत हेच खरे गुन्हेगार...

ठाकरे गटाचे खा. संजय राऊत हेच खरे गुन्हेगार आहेत, असा पलटवार शिवसेनेचे प्रवक्ते आ. संजय शिरसाट यांनी केला आहे. माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे महाराष्ट्राचे गुन्हेगार असल्याची राऊत यांची टीका निरर्थक असून, कोश्यारी यांना गुन्हेगार ठरविणारे संजय राऊत कोण आहेत, असा प्रश्न शिरसाट यांनी केला. कोश्यारी यांना महाराष्ट्राचे गुन्हेगार ठरविण्याचा राऊत यांना अधिकार नाही. महाराष्ट्राच्या राजकारणातील ठाकरे गटाचा खरा गुन्हेगार संजय राऊत हेच आहेत. म्हणून उद्धव ठाकरे यांनी त्यांना बाजूला बसण्याची संधी देता कामा नये, असेही ते म्हणाले. कर्नाटकात अनेक वर्षांनंतर काँग्रेसला विजय मिळाला. यामुळे काँग्रेसचे प्रदेसाध्यक्ष नाना पटोले यांच्या अपेक्षा वाढलेल्या दिसतात. परंतु अनेक राज्यांत काँग्रेसची अवस्था वाईट आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसचा पंतप्रधान होईल हे पटोले यांचे वक्तव्य हास्यास्पद आहे, असेही ते म्हणाले. दोन्ही काँग्रेसचे नेते राऊत यांना कधीच गांभीर्याने घेत नाहीत. मात्र ठाकरे गटाला राज्यातील सत्ताकारणातून हद्दपार करण्याचे काम राऊत करीत असल्याचा दावा शिरसाट यांनी केला.

---

म.टा.पु.पा.नं. १

# वसई किल्ल्यामध्ये विघातक कृत्य

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसई किल्ल्यातील येणाऱ्या काही स्थानिकांनी इन्स्टाग्रामवर व्हिडीओ बनवण्याच्या नादात थेट किल्ल्यातील चर्चमध्येच आग लावण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे वसई किल्ल्याची विटंबना झाल्याचा आरोप किल्लाप्रेमींनी केला आहे. या प्रकाराकडे पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष असून विटंबना करणाऱ्या स्थानिक तरुणावर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

वसई किल्ल्यातील एका चर्चमध्ये एका तरुणाने रील्स बनविण्यासाठी किल्ल्यात आग लावल्याची घटना घडली. याबाबत इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत यांनी पुरातत्त्व विभागाकडे ईमेलद्वारे तात्काळ तक्रार केली असून या तरुणावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याआधीही किल्ल्यातील विविध घटनांबाबत तक्रार केली असता पुरातत्त्व विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. किल्ल्यात मुख्य दरवाजा लावण्याची मागणी त्यांनी या निमित्ताने पुन्हा एकदा केली आहे. तसेच, या तरुणावर कारवाई करण्याची मागणीही केली आहे.

---

म.टा.पु.पा.नं. १

### जखमी फ्लेमिंगोला जीवनदान

**वसई :** अर्नाळा येथे जखमी झालेल्या फ्लेमिंगोला पक्षीमित्र आणि स्थानिकांनी जीवनदान दिले आहे. जखमी अवस्थेत असलेल्या या फ्लेमिंगोला पक्षी अभ्यासकांमार्फत उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. 'मी जागृत बंदर पाडेकर समूहा'चे सदस्य अजय म्हात्रे हे रविवारी सकाळी अर्नाळा समुद्रकिनारी मॉर्निंग वॉकला गेले असताना त्यांना जखमी अवस्थेत फ्लेमिंगो पक्षी आढळला. काही नागरिक त्या पक्ष्याला नेण्याचा प्रयत्न करत होते. मात्र त्या पक्ष्याची दुर्मिळता आणि महत्त्व सांगितल्यावर त्यांनी तो पक्षी अजय यांच्याकडे सुपूर्द केला. त्यानंतर बंदर पाडेकर समूहाचे निनाद पाटील यांनी पक्षीमित्रांशी संपर्क साधला. जखमी फ्लेमिंगोला पक्षी अभ्यासकांनी ताब्यात घेऊन त्यांना उपचारासाठी पक्ष्यांच्या रुग्णालयात दाखल करण्यास नेले आहे.

---

म.टा.पु.पा.नं. १

### दलाल महिलेला अटक

**मिरा-भाईंदर :** कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या गरजू तरुणींचा शोध घेत त्यांना शरीरविक्रयासाठी प्रवृत्त करणाऱ्या एक दलाल महिलेला अटक करण्यात आली. ही कारवाई मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधित कक्षाकडून करण्यात आली. न्यू गोल्डन नेस्ट परिसरात राहणारी एक महिला पुरुष ग्राहकांना तरुणींची छायाचित्रे पाठवून शरीरविक्रयासाठी राहते घर देत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार बोगस ग्राहकाला पाठवून पोलिसांनी छापा टाकला. बोगस ग्राहकाला तरुणींची छायाचित्रे पाठवल्यानंतर शरीरविक्रयासाठी तरुणी उपलब्ध करून देताना सायरा शेख उर्फ दिव्या मंगलकर ही दलाल महिला आढळली. यावेळी तिच्यासोबत असणाऱ्या पीडित तरुणीची सुटका करत दलाल महिला व तिच्या सहकारी महिलेविरोधात नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहकारी महिलेचा शोध पोलिस घेत आहेत.

CamScanner

दि.22/04/2023

पुण्य नगरी पा.न.१

# सरकारकडून सत्तेचा वापर जातीय दंगलीसाठी - पवार

**अहमदनगर :** देशाचे चित्र बदलत आहे. पन्नास वर्ष देशाला मागे घेऊन जाण्याचे काम सुरू आहे. जाती धर्माच्या नावावर राजकारण करणाऱ्यांच्या हाती सत्ता आहे. या सत्तेचा वापर कष्टकऱ्यांच्या उन्नतीसाठी होत नसून जातीय दंगली करण्यासाठी होत आहे. नगर जिल्ह्यातील शेवगावमध्ये बाजारपेठा बंद राहतात. आपल्यासमोर मोठी आव्हाने उभे असून ही आव्हाने परतून लावण्यासाठी सर्वांनी तयार राहणे गरजेचे आहे. कर्नाटक राज्यामध्ये कष्टकरी माणसांची एकजूट होऊ शकते ते देशामध्ये इतरत्र होण्यासाठी सर्वांनी पुढे यावे. कामगार कायद्यावर हल्ला होत आहे. महाराष्ट्र राज्याने देशाला जनतेच्या हिताचे कायदे दिले आहेत. कामगार कायदा देखील देशाला दिला आहे. न्याय हक्क घेण्यासाठी एकजूट होण्याची भूमिका घ्यावी लागणार आहे. जी संकटे येत आहेत त्यावर मात करण्यासाठी एकजुटीची आवश्यकता आहे. कै. शंकरराव घुले यांची ओळख लोकनेते म्हणून आहे. त्यांनी कष्टकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. नगर शहराचे नगराध्यक्ष ते पंचवीस वर्ष नगरसेवक अशी मोठी कामगिरी त्यांनी केली आहे. समाज हितासाठी नेहमी आग्रही भूमिका



घेणारे ते होते, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.

अहमदनगरच्या मार्केट यार्ड येथे राज्यस्तरीय हमाल माथाडी २१ वे अधिवेशन व हमाल पंचायतचे नेते कै. शंकरराव घुले अण्णा यांच्या पुतळ्याचे अनावरण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पवार बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव, आ. संग्राम जगताप, पद्मश्री पोपटराव पवार, हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, आ. निलेश लंके, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, उपमहापौर गणेश भोसले, माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, अरुण कडू आदी उपस्थित होते.

कॉ. आढाव म्हणाले की, आपला देश संकटामध्ये आहे. आपली लोकशाही जिवंत राहण्यासाठी शेवटपर्यंत लढा देत राहील. मोदी म्हणतात, प्रतिज्ञा मला मान्य नाही. महाराष्ट्राने देशाला खूप काही दिले आहे. कामगार कायदा, रोजगार, हमीचा कायदा आदींसह विविध कायदे महाराष्ट्रामुळे तयार झाले. संयुक्त महाराष्ट्र हा कामगारांच्या लढ्यामुळे उभा राहिला आहे. गरीबांच्या प्रश्नावर सध्या चर्चा होत नाही. देशाला स्वतंत्र होऊन ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. मजूर गाव सोडून जात आहे, त्याला दोषी कोण आहे. लोकशाही धोक्यात आली असून आपल्याला घटनेचे राज्य करायचे आहे की ▸▸ पान ७ वर...

# सरकारकडून सत्तेचा वापर जातीय दंगलीसाठी - पवार

**(पान १ वरून)** धर्माचे करायचे आहे. इंग्रजांना घालवणे सोपे होते, असे ते म्हणाले. स्वागताध्यक्ष आ. जगताप म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार व बाबा आढाव यांचे या वयात समाजाप्रती सुरू असलेले कार्य आमच्यासारख्या युवकांना प्रेरणादायी आहे. कष्टकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आढाव यांनी संघर्ष उभा करीत विविध प्रश्न मार्गी लावले आहेत. कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्यस्तरीय हमाल माथाडी पंचायतच्या वतीने २१ वे अधिवेशन भरवण्यात आले आहे. कै. शंकरराव घुले यांनी नगर जिल्ह्यामध्ये हमाल पंचायतच्या माध्यमातून कामगार हक्काच्या न्यायासाठी काम सुरू केले व त्या माध्यमातून विविध प्रश्न मार्गी लावले आहेत. त्यांचा हा वारसा नगरसेवक अविनाश घुले सक्षमपणे चालवत आहेत. कष्टकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कामगार चळवळ उभी राहणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले म्हणाले की, माथाडी मंडळाचा कारभार कामगारांच्या विरोधात आहे, शिंदे-फडणवीस सरकार हा कायदा गुंडाळण्याच्या तयारीत आहे. कामगारांच्या प्रश्नावर चर्चा करायलासुद्धा तयार नाहीत. माथाडी कामगार कायदा वाचला पाहिजे, माथाडी मंडळाची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे, माथाडी मंडळ सक्षम राहिले तरच कामगारांचे प्रश्न सुटू शकतात. दीनदुबळ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी हमाल पंचायत कटिबद्ध असल्याचे ते म्हणाले.

पुण्य नगरी पु.पा.न.१

# रिक्षाचालकास लुटणाऱ्यांना अटक

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर व आसपासच्या परिसरात अज्ञात व्यक्ती रिक्षामध्ये प्रवाशी बनून प्रवास करत होते. प्रवास करताना रिक्षाचालकाला निर्जनस्थळी नेऊन फ्रुटीमध्ये गुंगीचे औषधे देऊन त्यांच्या अंगावरील दागिने लुटणाऱ्या तिघांना गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा यांनी गुजरातमधून अटक केली आहे.

बोरिवली ते मीरा रोड व आसपासच्या परिसरात काही अज्ञात व्यक्ती हे रिक्षाचालकाला प्रवाशी बनून रिक्षात बसून घेऊन जात होते. बोरिवली येथून दोघे प्रवाशी मीरा रोडला जायचे आहे असे सांगून रिक्षात बसले. रिक्षाचालक हा प्रवाशी घेऊन बाप्पा सीताराम मंदिरासमोर, शांतीनगर, मीरा रोड येथे येत असताना त्या प्रवाशांनी आपापसात संगनमत करून प्रवास करत असताना त्या रिक्षाचालकाला फ्रुटीमध्ये गुंगीचे औषध मिसळून पिण्यास दिले. त्यानंतर तो रिक्षाचालक बेशुद्ध झाल्यावर त्याच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन काढून घेतल्याबाबत नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हे शाखा, कक्ष काशिमीरा यांनी नमूद गुन्ह्याचा तपास करून गुन्हे करणारे आरोपी सागर महेंद्रभाई पारेख, रा. सुरत, संपतराज ऊर्फ संपो गेवरचंद जैन, सुभाष अरविंद पाटील, गुजरात यांना ताब्यात घेऊन तपास केला. त्या वेळी त्यांनी हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्या तिघांना अटक करून त्यांच्याकडून गुन्ह्यात फसवणूक केलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे.

CS CamScanner

दि. २२/०५/२०२३

पुण्य नगरी पु.पा.न. ४

# जी २० स्वच्छता मोहिमेसाठी उत्तन समुद्रकिनाऱ्याची निवड

## मीरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त दीपक ढोले यांच्या उपस्थितीत राबवली स्वच्छता मोहीम

**मीरा रोड :** जी२० अंतर्गत देशातील विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवणे तसेच समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबवण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर जी२० अंतर्गत देशातील विविध समुद्रकिनाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये मीरा-भाईंदरमधील उत्तन समुद्रकिनाऱ्याची निवड करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मेगा बीच क्लीनअपचे मीरा-भाईंदर महापालिकेच्या वतीने आयोजन करण्यात आले. या वेळी मीरा-भाईंदर महापालिका आयुक्त तथा प्रशासक दिलीप ढोले यांच्या उपस्थितीत उत्तन समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

समुद्रात किंवा समुद्रकिनारी मानवाच्या कृतीतूनच अस्वच्छता पसरवली जाते. त्यामुळे समुद्राचे पाणी हे दूषित होते. त्याचा परिणाम समुद्रातील जलचरांवर होत आहे. समुद्रात किंवा समुद्रकिनाऱ्यावर प्लास्टिक पिशव्या, बॉटल, खाद्यपदार्थांचे आवरण टाकून अस्वच्छता पसरवण्यात येते. त्यांची



स्वच्छता करणे हे शहरातील सर्व नागरिकांचे कर्तव्य आहे, असे आयुक्त यांनी सांगितले. त्या अनुषंगाने आयुक्त व महापालिका विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. तसेच वाळूच्या आत दडलेले प्लास्टिक पिशव्या, बॉटल व इतर कचरा साफ करण्यासाठी अत्याधुनिक यंत्राचा वापर करण्यात आला. आठवड्यातून किमान दोन वेळा स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक, विविध सामाजिक संस्था यांच्या वतीने बीच क्लीनअप मोहीम राबवून आपला समुद्र व किनारा स्वच्छ ठेवण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक दिलीप ढोले यांनी केले आहे.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार उत्तन समुद्रकिनाऱ्यावर राबवण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेसाठी महापालिकेकडून गाड्यांसाठी पार्किंग व्यवस्था, अॅम्ब्युलन्स व्यवस्था, ग्लोव्हज, सॅनिटायझर, पाणी व्यवस्था, अत्याधुनिक बीच क्लीनअप यंत्र, कचरा वर्गीकरण करण्यासाठी कचऱ्याचे डबे इत्यादींची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच या समुद्रकिनाऱ्यावर राबवण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतलेल्या सामाजिक संस्था प्रतिनिधी, शालेय विद्यार्थी, लहान मुले, स्वच्छता कर्मचारी यांना आयुक्त तथा प्रशासक दिलीप ढोले यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

त्याचबरोबर समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता मोहिमेसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेबाबत व ही स्वच्छता मोहीम यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल केंद्र शासनाचे पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयातील नोडल अधिकारी दिक्षा दाधीच यांनी समाधान व्यक्त केले.

लोकमत पा.न. ५

# व्यापाऱ्याला ठार मारण्याची धमकी

**नालासोपारा :** जमीन खरेदी-विक्रीचा व्यवसाय करणाऱ्याला पिस्तुलचा धाक दाखवून जिवे ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. यशवंत गौरवच्या आयान रेसिडेन्सी येथे राहणाऱ्या अब्दुल मजीद कुरेशी (वय ४५) यांचा जमीन खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. शनिवारी दुपारी उस्मान शेख, तारीख शेख, , अमन शेख, फरमान शेख व चार ते पाच आरोपींनी त्यांना बेदम मारहाण केली. तसेच अमन शेखने धमकी दिली. पेल्हार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

दि. २२/०५/२०२३

लोकमत पु. पा. नं. १

# मोबाइल पुन्हा सापडण्याचे प्रमाण केवळ सव्वा टक्का

## चार महिन्यांत १,६०० गहाळ : परत मिळाले १८३ मोबाइल

धीरज परब
लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा-भाईंदर :** मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत जानेवारी ते एप्रिल २०२३ या चार महिन्यांतील गहाळ झालेले व चोरीला गेलेल्या मोबाइलची संख्या -सुमारे १,६०० च्या घरात असून, त्यापैकी केवळ १८३ मोबाइल हस्तगत केले आहेत. त्यामुळे मोबाइल पुन्हा मिळविण्याचे प्रमाण अवघा एक ते सव्वा टक्का इतकेच आहे. त्यातही चोरीच्या प्रकरणात गुन्हा दाखल केला जात असला, तरी गहाळ झालेल्या मोबाइल प्रकरणात गुन्हा दाखल केला जात नसल्याने, सापडलेले मोबाइल प्रामाणिकपणे परत करण्याचे प्रमाण नाममात्र आहे.

पोलिस आयुक्तालयाच्या जनसंपर्क विभागातून दिलेल्या माहितीनुसार, मीरा-भाईंदर आणि वसई-विरार भागात जानेवारी ते एप्रिल २०२३ या चार महिन्यांतील गहाळ मोबाइलची संख्या १ हजार ४६० इतकी आहे. त्यापैकी ६७ मोबाइल पोलिसांना सापडले आहेत. ५२ मोबाइल हे संबंधित व्यक्तींना परत केले गेले. याच कालावधीत मोबाइल चोरीचे ११० गुन्हे दाखल झालेले आहेत, तर ५५ आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. त्यांच्याकडून ११६ मोबाइल हस्तगत केले आहेत. ५० मोबाइल नागरिकांना परत केले आहेत.

### प्रवासात विसरण्याच्या घटना अधिक

- रिक्षा, बस, ट्रेन आदींमध्ये प्रवासाच्या दरम्यान वा एखाद्या सार्वजनिक ठिकाणी मोबाइल विसरण्याचे, पडण्याचे प्रकार हे जास्त होतात. त्यामुळे गहाळ मोबाइलच्या नोंदी जास्त आहेत, असे सांगितले जाते. गहाळ झालेला मोबाइल हा कोणाला ना कोणाला सापडलेला असतो.
- या मोबाइलची विक्री, तसेच वापर करणे हा फौजदारी दखलपात्र गुन्हा आहे. मात्र, पोलिस तसे गुन्हे दाखल करत नसल्याने, चोरटे व लबाडी करणारे मोकाट आहेत.
- पोलिसांनी हरवलेला मोबाइल परत करणाऱ्यांचे कौतुक करणे जसे आवश्यक आहे, तसेच मोबाइल लबाडीने स्वतःकडेच ठेवणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे गरजेचे आहे.



### विदेशातही होते विक्री

गहाळ झालेले मोबाइल हे पुन्हा वापरात आल्यास त्याच्या आयएमईए क्रमांकावरून पुन्हा सापडतात. चोरी झालेले मोबाइल हे देशातच नव्हे, तर ते नेपाळ, बांगलादेशपासून अन्य देशांतही विक्रीसाठी पाठविले जातात. मोबाइलमधील महागडे पार्ट विक्री केले जातात. मात्र, हे खूपच कमी प्रमाण असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

मुलगी रिक्षात प्रवास करत असताना २३ एप्रिल, २०२१ रोजी १२ हजारांचा मोबाइल गहाळ झाला होता. पोलिसांनी त्यावेळी मोबाइल मिळेल, असे आश्वस्त केले होते. नुकताच पोलिसांनी तो मोबाइल परत मिळवून दिला आहे. मोबाइल सुस्थितीत आहे. यामुळे पोलिसांवरील विश्वास आणखी वाढला असून आनंद झाला.

**- बाळासाहेब गोडसे, काशिमीरा**

लोकमत पु. पा. नं. १

# घंटा चोरणारा चोर अटकेत

**मीरा रोड :** मीरा रोडच्या शंकेश्वर जैन पार्श्वनाथ मंदिरातील दोन पितळी घंटा चोरी करणाऱ्या चोरट्यांना गुन्हे शाखा १ ने अटक केली आहे. नयानगर पोलिस ठाण्यात दाखल घंटाचोरीचा तपास गुन्हे शाखा कक्ष १ चे पोलिस निरीक्षक अविराज कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक करत होते. खबरी, सीसीटीव्ही फुटेजसह तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने पोलिसांनी आवेश अहमद खान याला पकडले. त्याने त्याच्या साथीदारासोबत मध्यरात्रीनंतर घंटा चोरल्याचे तसेच चोरलेली घंटा भंगार विक्रेत्यास विकल्याचे कबूल केले. याप्रकरणी नयानगर पोलिस पुढील तपास करत आहेत.

CamScanner

दि. 22/04/2023

सकाळ पा. न. ५

# भाजप-शिंदे गटातील वाद विकोपाला!

## नवी मुंबई महापालिका निवडणुकांमध्ये दोन्ही पक्षांची वेगवेगळी तयारी?

**सकाळ वृत्तसेवा**

नवी मुंबई, ता. २१ : माजी मंत्री आणि भाजपचे आमदार गणेश नाईक यांच्यावर एका महिलेने केलेल्या आरोपानंतर नवी मुंबईचे राजकारण ढवळून निघाले आहे. संबंधित महिलेने काही महिन्यांनंतर हे आरोप मागे घेऊन त्याचे खापर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विजय चौगुले आणि भाजपच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्यावर फोडले. आता या महिलेची नार्को टेस्ट ते पोलिस चौकशी करण्याची मागणी चौगुले आणि म्हात्रे यांनी केली आहे. या दोन्ही प्रकरणांमुळे भाजप आणि शिंदे गटातील नेत्यांचा वाद आता टोकाला पोहोचला आहे. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केल्यानंतर आता हे दोन्ही गट महापालिका निवडणुकीसाठी वेगवेगळी तयारी करीत असल्याचे चित्र नवी मुंबईत दिसत आहे.

### भाजपला पालिका निवडणूक जड जाणार?

महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजण्याआधीच नवी मुंबईत भाजप आणि शिवसेनेच्या शिंदे गटात दुरावा निर्माण झाला आहे. भाजपच्या आमदार मंदा म्हात्रे आणि आमदार गणेश नाईक यांचे विळ्या-भोपळ्याचे नाते सर्वश्रुत आहे. नवी मुंबईत रंगलेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या प्रकरणात म्हात्रे आणि विजय चौगुले यांचे नाव आल्यामुळे या निवडणुकीत नाईकांना मदत करण्याची शक्यता धुसर झाली आहे. अशा परिस्थितीत गणेश नाईक यांना महापालिका निवडणुकीत मविआशी एकट्यालाच लढावे लागण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मदतीने राज्यात सरकार स्थापन केले. त्यानंतर नवी मुंबईच्या शिवसेनेतही दोन गट पडले. शिवसेनेचे दोन गट पडले असले, तरी दोघांचा शत्रू अद्याप एकच आहे. शिंदेंनी भाजपसोबत संसार थाटल्यानंतरही नवी मुंबईतील त्यांच्या नेतेमंडळींचे गणेश नाईकांसोबत अद्याप सूर जुळलेले नाहीत. विजय चौगुले, शिवराम पाटील, किशोर पाटकर, सुरेश कुलकर्णी ही बडे नेतेमंडळी अद्यापही नाईकांसोबत जुळवून घेण्यास राजी नाहीत. अलिकडे नाईकांवर झालेले आरोप, त्या महिलेला मिळालेला राजाश्रय आणि लगेच शिवसेनेच्या नेत्यांसोबत भाजपच्याही आमदारावर महिलेने केलेल्या आरोपांमुळे नाईक आणि शिंदे गटातील नेत्यांचा वाद आता अधिक विकोपाला पोहोचला आहे.

सकाळ पा. न. ५

# बलात्कार प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता

भाईंदर, ता. २१ (बातमीदार) : सहावर्षीय मुलीच्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या आरोपीची सर्वोच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. २०१० मध्ये भाईंदर येथे घडलेल्या घटनेप्रकरणी सत्र आणि उच्च न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली होती. याप्रकरणी निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने पोलिस तपासातील त्रुटी आणि चुकांवर बोट ठेवले आहे.

भाईंदर पश्चिम येथील एका झोपडपट्टी परिसरातील एका सहावर्षीय मुलीचा बलात्कार करून हत्या झाल्याची घटना ११ जून २०१० रोजी उघडकीस आली होती. तपासाअंती पोलिसांनी प्रकाश निषाद याला अटक केली होती. याप्रकरणी २७ नोव्हेंबर २०१४ रोजी सत्र न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले होते. मुलीच्या हत्येप्रकरणी फाशी आणि इतर गुन्ह्यांसाठी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. ऑक्टोबर २०१५ मध्ये उच्च न्यायालयाने हा निकाल कायम ठेवला होता.

उच्च न्यायालयाच्या निकालाला आरोपीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (ता. ९) याप्रकरणी निकाल दिला. निकाल देताना न्यायालयाने पोलिस तपासातील प्रक्रियात्मक त्रुटी आणि चुकांवर बोट ठेवले आहे. त्यात प्रमुख साक्षीदारांची उलटतपासणी न घेणे, आरोपीची घटनास्थळावरील उपस्थिती सिद्ध करणारा कोणताही ठोस पुरावा नसणे, डीएनए चाचणीसाठी रक्ताचे नमुने कोणी घेतले त्याची स्पष्टता नसणे, आदी कारणांमुळे आरोपीवर गुन्हा निश्चित करणे कठीण झाले, असे मत न्यायालयाने व्यक्त केले.

सकाळ पु. पा. न. १

# मिरा-भाईंदरमध्ये बुधवारी खडखडाट

भाईंदर (बातमीदार) : मिरा-भाईंदर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्राधिकरणाकडून पावसाळ्यापूर्वीची दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यासाठी शहराला स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा बुधवारी (ता. २४) सकाळी नऊ ते गुरुवारी (ता. २५) सकाळी नऊ वाजेपर्यंत २४ तासाकरिता बंद करण्यात येणार आहे. या काळात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून होणारा पाणीपुरवठा सुरू राहणार आहे. त्यामुळे स्टेम प्राधिकरणाचा पाणीपुरवठा पूर्ववत होईपर्यंत मिरा-भाईंदर शहराला पाणीपुरवठा कमी दाबाने व उशिराने होणार असल्याने नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

CamScanner

दि. 22/05/2023

सकाळ पु. पा. न. 1

# कचरा विल्हेवाटीचा प्रश्न सुटेना!

## शहरात सौंदर्यीकरण उपक्रमानंतरही समस्या 'जैसे थे'

वसई, ता. २१ (बातमीदार) : वसई विरार महापालिकेने शहरात 'मेरी लाईफ, मेरा स्वच्छ शहर' हा केंद्र सरकारचा उपक्रम राबवण्यासाठी कंबर कसली आहे; परंतु वर्षभर साचलेला कचरा, क्षेपणभूमीवरील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात अद्यापही यश आले नाही. महापालिकेला हरित लवादाने १७० कोटी रुपयांचा दंड भरण्याचा आदेशदेखील दिला असून कारवाईचे संकेत दिले आहेत. शहरातील कचरा विल्हेवाटीचा प्रश्न गंभीर आहे. महापालिकेने सौंदर्यीकरण उपक्रम राबवल्यानंतरही कचऱ्याची समस्या जैसे थे असल्याचे चित्र आहे.



**वसई :** शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर होत आहे.

महापालिकेकडून राबवण्यात येणारे घनकचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी प्रकल्प अद्यापही अपूर्ण आहे. त्यामुळे पर्यावरणाचा प्रश्न गंभीर असून शहराला प्रदूषणाचा विळखा निर्माण झाला आहे. अशातच महापालिकेने घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी प्रकल्पाच्या उभारणीला प्रारंभ केला असला, तरी पूर्ण करण्यासाठी विलंब लागत आहे. त्यातच महापालिकेला हरित लवाद व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला आदेश दिले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा पर्यावरण व प्रदूषणाचा मुद्दा समोर आला आहे. अशातच महापालिकेने स्वच्छ शहराकडे लक्ष केंद्रित केले आहे. या अभियानांतर्गत शहरातील नागरिकांनी वापरलेली जुनी पुस्तके, प्लास्टिक, कपडे, पादत्राणे आणि इतर निरुपयोगी वस्तू गोळा करून त्यांचा पुनर्वापर करण्यासाठी महापालिकेकडे जमा करायची आहेत. यासाठी जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. ५ जूनपर्यंत ही मोहीम राबवली जाणार आहे.

वस्तू गोळा करण्यासाठी, नागरिकांना माहिती देण्यासाठी, तसेच घरोघरी संपर्क करण्यासाठी वसई विरार महापालिकेमार्फत तसेच, महिला बचत गट व इतर स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. केंद्र चालवण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी शहरातील नागरिकांनी व संस्थांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पर्यावरण दिनानिमित्त अगोदरच प्रशासन जनजागृतीसाठी प्रयत्न करत असल्याने नागरिकांतून स्वागत होत असले, तरी क्षेपणभूमीवर कचरा जमा होतो, त्याची विल्हेवाट लावण्यास यश आल्यास नागरिकांना मोकळा श्वास घेता येणार आहे. या प्रकरणी प्रतिक्रियेसाठी महापालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही.

### सौंदर्यीकरणाच्या ठिकाणीच अस्वच्छता

वसई, विरार शहरांत सौंदर्यीकरण करण्यात आले; परंतु त्या ठिकाणी अस्वच्छता होत आहे. थुंकणे, पिचकारी मारून सौंदर्यीकरणावर लाल डाग निर्माण होत आहेत. अनेक ठिकाणी उघड्यावर कचरादेखील टाकला जात आहे. देखभालीचे काम करणे महत्त्वाचे आहे; अन्यथा खर्च आणि शहराचे विद्रूपीकरण होईल. त्यामुळे महापालिकेने याकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

संकलन केंद्र, स्वच्छता मोहीम केवळ काही काळासाठी नसावी. शहरात कचऱ्याचे साम्राज्य पसरत असते; परंतु याकडे अनेकदा कानाडोळा केला जातो. घनकचरा व्यवस्थापन झाले पाहिजे, तरच नागरिकांना पर्यावरणपूरक वातावरण व प्रदूषणापासून मुक्ती मिळेल. महापालिकेने कृतिशील पावले उचलावीत.

**- महेश सरवणकर**, उपाध्यक्ष, भाजप वसई रोड मंडल

वसई विरार महापालिका संकलन केंद्र उभारत आहे. स्वच्छ शहराचा उपक्रम योग्य आहे; परंतु डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याची विल्हेवाट केव्हा लावणार? शास्त्रोक्त पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन केले पाहिजे. शहराला सुंदर, स्वच्छ ठेवण्यासाठी पालिकेने अधिकाधिक अधिक योजना आणाव्यात.

**- कुलदीप वर्तक**, काँग्रेस नेता, वसई विरार शहर

वसई विरार महापालिकेची स्थापना होऊन १४ वर्षे झाली, मात्र पर्यावरणासाठी बाबतीत अद्यापही दुर्लक्ष होत आहे. सांडपाणी प्रकल्प, घनकचरा प्रकल्प पूर्ण झाला नाही. हरित लवाद, महाराष्ट्र प्रदूषण मंडळानेदेखील ताशेरे ओढले आहेत. पर्यावरणाबाबतीत पालिकेने लक्ष द्यावे.

**- समीर वर्तक**, प्रदेशाध्यक्ष, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

सकाळ पु. पा. नं. 3

# दिव्यांगांच्या समस्या मार्गी लावणार!

## वसई-विरार महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांचे आश्वासन

विरार, ता. २१ (बातमीदार) : वसई विरार महापालिका परिसरातील दिव्यांगांच्या समस्या लवकरच मार्गी लागणार आहेत. त्यांच्या सक्षमीकरणाबाबत महापालिकेकडून योजना राबवल्या जातात, त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल, तसेच दिव्यांगांच्या शिष्टमंडळाने सुचवलेले नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणार, असे आश्वासन महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी अपंग कल्याणकारी संस्थेच्या शिष्टमंडळाला दिले.

दिव्यांगांच्या विविध प्रश्नांबाबत अपंग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष शमीम खान यांच्यासह संस्थेच्या शिष्टमंडळाने आयुक्त अनिलकुमार पवार यांची नुकतीच भेट घेतली. महापालिका परिसरातील दिव्यांगांच्या अडचणी आयुक्तांपुढे मांडण्यात आल्या. पालिकेच्या योजना दिव्यांगांपर्यंत पोहचत नसल्याबाबत शिष्टमंडळाने खंत व्यक्त केली. दिव्यांगांच्या समस्यांबाबत लेखी निवेदन आयुक्तांना सादर करण्यात आले. त्यावर आयुक्त अनिलकुमार पवार यांनी प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर चर्चा करून दिव्यांगांच्या अडचणी तातडीने सोडवण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीमध्ये संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष शमीम खान, प्रहार सेवक बाबू वाल्मिकी, नीलेश देशपांडे, प्राजक्ता हनकोलकर, शाहीद सय्यद, अॅड. रितेश बनसोडे आदी उपस्थित होते.

### दिव्यांगांसाठी लवकरच स्पर्धा परीक्षा केंद्र

आयुक्त पवार म्हणाले की, पदवीधर दिव्यांगांसाठी लवकरच स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू केले जाईल. दिव्यांगांचे असलेले स्टॉल नियमानुकूल म्हणजे महापालिकेचा परवाना, ना हरकत दाखला देण्यात येईल. कृत्रिम अवयव निर्माण केंद्र सुरू करण्यात येईल, तसेच महापालिकेतील दिव्यांगांसाठी व्यापक धोरण तयार करण्यात येईल.

CamScanner

दि. 22/04/2023

सकाळ पु. पा. नं. २

# खाडी पुलाचा जिना जीर्णावस्थेत

## नायगावमधील नागरिकांची पावसाळ्यात गैरसोय होण्याची शक्यता

विरार, ता. २१ (बातमीदार) : सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नायगाव पूर्वेतील खाडीवरील सोपारा पूल बांधण्यास घेण्यात आला आहे. मात्र स्थानिकांनी कामाला विरोध केल्याने हे प्रकरण न्यायालयात गेल्यामुळे या पुलाचे काम रखडले आहे. आता या पुलाच्या जिन्यातील लोखंडी पायऱ्या गंजल्याने त्याला अनेक ठिकाणी छिद्र पडले आहेत. त्यामुळे पावसाळ्यात या पुलावरून ये-जा करताना नागरिकांना इजा होण्याची शक्यता वर्तवण्यात येते.




**विरार :** खाडीवरील सोपारा पुलावर नागरिकांची वर्दळ असून पायऱ्या गंजलेल्या अवस्थेत आहेत.

> पुलाच्या पश्चिमेकडील काम सुरू करण्यात आले होते; परंतु नागरिकांनी जागा देण्यास विरोध करून ते न्यायालयात गेले. त्यानंतर न्यायालयाने नोव्हेंबर २०२२ मध्ये काम बंद करण्यास सांगितले. न्यायालयात बाजू मांडण्यासाठी वकील नेमले आहेत. न्यायालयाच्या निर्णयानंतरच काम सुरू करता येणार आहे.
> **- प्रशांत ठाकरे**, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

> पूल लोखंडी असल्याने गंजला आहे. पावसाळ्यात अजून गंजण्याची शक्यता असून पादचाऱ्यांना त्रास होत आहे.
> **- नीलेश सावंत**, स्थानिक

सार्वजनिक बांधकाम विभागाने नायगाव पूर्वेतील खाडीवरील सोपारा पूल बांधण्यास सहा वर्षांपूर्वी घेतला आहे. या अगोदरच्या लाकडी पुलावरून पावसाळ्यात नागरिकांना कसरत करून नायगाव स्थानक गाठावे लागत होते; तर नायगाव आणि भाईंदरमध्ये रेल्वेने नव्या मार्गिका टाकल्याने या खाडीवर दोन पूल उभारले. त्यावेळी पुलासाठी लागणारे साहित्य नायगाव पूर्वेकडून आणण्यासाठी रेल्वेच्या कंत्राटदाराने नायगाव पूर्वेकडील खाडीवर लोखंडी पूल उभारला होता. त्याचा फायदा पूर्वेकडील १५ गावांना नायगाव रेल्वेस्थानकावर येण्यासाठी होत होता. सात वर्षांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने खाडीवरील पुलाच्या कामाला सुरुवात केली होती; परंतु या पुलाचे काम सातत्याने रखडत आले आहे. पुलाच्या पश्चिमेकडील बाजूस उतरण्यासाठीचे काम सुरू झाल्यानंतर नागरिकांनी मोबदल्यासाठी हे काम थांबवले आणि न्यायालयात धाव घेतली. या पुलाचे काम नोव्हेंबरपासून बंद आहे.

पुढारी पा. न. ३

# मोटार सायकल चोरी करणाऱ्यास अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत दोन अज्ञात इसमांनी मोटार सायकल चोरी करून तिच्या सहायाने इतर ठिकाणी चोरी करत होते. या आरोपींना गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांनी अटक केली आहे.

अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीतील बोळींज, विरार पश्चिम या परिसरात राहणाऱ्या गंगाबाई यशवंत गोरीवले (८०) या सोसायटीचे आवारातील कट्ट्यावर बसलेल्या असताना दोन अनोळखी इसमांनी मोटार सायकलवर येऊन त्यांच्या गळ्यातील ११ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरीने खेचुन पळून गेले होते. त्याबाबत अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील वसई-विरार परिसरात गेल्या काही महिन्यापासून जबरी चोरी व मोटारसायकल चोरीच्या गुन्हयांत वाढ झाल्याने सदर घटनांची वरिष्ठांनी दखल घेवुन आरोपी यांचा शोध घेवून गुन्ह्यास पायबंद घालण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखा, कक्ष ३ विरारचे पोलीस पथकाने तपास करून आरोपी शाहीद अब्दुल सतार कापडीया (३३) रा. फरीदा मंझील जी-१, वापी, गुजरात याला २० मे रोजी रोजी ताब्यात घेवुन तपास केला. तपासामध्ये त्याने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. आरोपीकडे अधिक तपास केला असता तो चोरी करण्यासाठी चोरी केलेली मोटार सायकल वापरत होता. २०,००० रुपये किंमतीची मोटार सायकल हस्तगत केली आहे. त्याने अर्नाळा सागरी पोलीस ठाणे, तुळींज पोलीस ठाणे, विरार पोलीस ठाणे येथे तीन गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे.

CS CamScanner

CS CamScanner

दि. 22/04/2023

सामना पा. नं. ३

# तुमच्या विरोधात बोलायला मुलाहिजा ठेवणार नाही

## आशीष शेलार यांचा राज ठाकरेंना इशारा



मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) – माझ्या पक्षावर आणि पक्षाच्या सर्वोच्च नेत्यावर टीका केल्यास तुमच्या विरोधात बोलायला मुलाहिजा ठेवणार नाही, असा इशारा मुंबई भाजपचे अध्यक्ष आशीष शेलार यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना दिला आहे.

राज ठाकरे यांनी दोन हजारच्या नोटाबंदीवर टीका करताना ही घरसोडवृत्ती असून असे सरकार चालवतात का, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली होती. त्याला प्रत्युत्तर देताना शेलार म्हणाले, सगळ्याच बाबतीत तुम्ही बोलले पाहिजे आणि तुम्ही बोललेले खरेच असेल असे मानण्याचे कारण नाही. तुम्ही आमच्यावर व्यक्तिगत टीका केलीत तर आम्ही उत्तर देणार नाही, मात्र पक्ष व नेतृत्वावर टीका केलीत तर खपवून घेणार नाही, असे शेलार यांनी राज ठाकरे यांना सुनावले.

दोन हजारांच्या नोटांवरची बंदी ही घरसोडवृत्ती नसून जे सुटलेले आहेत त्यांना घरण्याचा हा कार्यक्रम आहे. आरबीआयच्या धोरणानुसार हा निर्णय घेतला आहे. तुमच्या गावात तरी हा विषय आहे का? मोदींच्या निर्णयानंतर आता लगेच काही लोक बोलायला लागले आहेत, असे शेलार म्हणाले.

सामना पा. नं. ६

## चोरटा गजाआड

**भाईंदर :** नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शंकेश्वर जैन पार्श्वनाथ मंदिरातील दोन पितळी घंटा चोरी करणाऱ्या चोरट्यांना गुन्हे प्रकटीकरण कक्ष – १ ने अटक केली आहे. चोरीचा गुन्हा दाखल होताच नयानगर पोलीस आणि गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा यांनी समांतर तपास केला. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आवेश खानच्या मुसक्या आवळल्या. त्याची चौकशी केली असताना आणखी एक साथीदार त्यांच्या सोबत असल्याची माहिती पोलिसांना दिली. चोरी केलेली घंटा भंगारवाल्याला विक्री केल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. फरार आरोपीचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सामना पा. न. ६

## तरुणीवर अत्याचार

**नालासोपारा :** लग्नाचे आमिष दाखवून नराधमाने तरुणीवर अत्याचार केल्याची घटना नालासोपाऱ्यात समोर आली आहे. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तलाठी ऑफिसजवळ राहणाऱ्या पीडित तरुणीवर शेजारी राहणाऱ्या नराधमाने २०२२ पासून लग्नाचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार केला. पीडित तरुणी गर्भवती राहिल्याने ही बाब उघडकीस आली.

सामना पा. न. ६

## घरफोडी

**वसई :** गावराईपाडा येथील साई शीतल अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या रुक्मिना बुधवत यांच्या घराचा कडी कोयंडा तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. कपाटातील २७ हजारांची रोख रक्कम चोरट्यांनी चोरून नेली. रुक्मिना बुधवत यांच्या तक्रारीवरून वालीव पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सामना पा. नं. ६

## पिस्तुलाचा धाक

**विरार :** जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्याला पिस्तुलाचा धाक दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्याविरोधात पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नालासोपाराच्या आयान रेसिडेन्सी येथे राहणाऱ्या अब्दुल कुरेशी यांचा जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. शनिवारी उस्मान शेख, तारीख शेख, अमन शेख, फरमान शेख व चार ते पाच अनोळखी आरोपींनी त्यांना बेदम मारहाण केली. तसेच अमन शेख याने पिस्तुलाचा धाक दाखवत जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

सामना पा. न. ६

## नोकरीचे आमिष

**नालासोपारा :** रेल्वेत नोकरी लावतो असे आमिष दाखवत तरुणाला एक लाखाचा गंडा घातल्याचा प्रकार नालासोपाऱ्यात समोर आला आहे. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आंबेडकर नगर परिसरातील काकडे निवास येथे राहणाऱ्या आकाश काकडे या तरुणाची अनिल तिवारी आणि राजेश रंजन या दोघांनी २०२१ पासून रेल्वेमध्ये नोकरी लावतो असे आमिष दाखवून फसवणूक केली.

CamScanner

दि. 22/05/2023

सामना पा. नं. ८

# नव्या संसदेचे उद्घाटन राष्ट्रपतींनी करावे

## राहुल गांधी यांचा मोदींना विरोध



नवी दिल्ली, दि. २१ (वृत्तसंस्था) - नव्या संसदेचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात यावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन करण्यास काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पाअंतर्गत ८६२ कोटी रुपये खर्चून नवी संसद उभारण्यात आली आहे. १८ मे रोजी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन त्यांना उद्घाटन करण्यासाठी रीतसर निमंत्रण दिले. मात्र पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यास काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आक्षेप घेतला आहे. नव्या इमारतीचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

लोकसत्ता पा. नं. ४

# अडचणीत माझी आठवण, मग मतदानावेळी कुठे जाता?

## शेतकऱ्यांना राज ठाकरे यांचा सवाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**नाशिक :** अडचणीच्या वेळी माझ्याकडे येतात, मग मतदानावेळी कुठे जातात, असा प्रश्न करीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी येथे आपल्या मनातील खदखद व्यक्त केली. तुमची पिळवणूक करणाऱ्यांना मतदान का करतात, असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांविषयी काही प्रतिनिधींसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊ, असे आश्वासन दिले.

राज ठाकरे हे नाशिकच्या दौऱ्यावर आहेत. रविवारी त्यांची शेतकऱ्यांनी भेट घेऊन समस्या मांडल्या. जिल्हा बँकेकडून थकबाकी वसुलीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनीचे लिलाव करण्यासह इतर मार्ग अवलंबले जात आहेत. त्याविषयी त्यांनी ठाकरे यांच्यासमोर गाऱ्हाणे मांडले. त्यांचे ऐकल्यानंतर ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांनी संप केला होता, तेव्हा काही शेतकऱ्यांनी आपली भेट घेतली होती, असे सांगितले.

CamScanner